२३/५

संचालनालय लेखा व कोषागारे
महाराष्ट्र राज्य, मुंबई-०१.
06 APR 2018
प्राप्त झाले सही

निलंबन......
श्री.दिलीप रघुनाथ झिरपे,मुख्यलेखाधिकारी
(सहाय्यक संचालक संवर्ग),अहमदनगर शहर
महानगरपालिका,अहमदनगर.

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
शासन आदेश क्रमांक :- निलंबन-२०१८/प्र.क्र.२३/कोषा.प्रशा-१
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-३२,
दिनांक :- ३१ मार्च,२०१८.

संदर्भ-संचालक,ले. व को,मुंबई यांचे पत्र क्र.संलेको २०१७/प्रशा.राप./सअ.१
अटक/श्री.दि.र.झिरपे/अहमदनगर मनपा/०३-२०१८/२६५,दि १९.०३.२०१८

## -:आदेश:-

ज्याअर्थी, श्री.दिलीप रघुनाथ झिरपे,मुख्यलेखाधिकारी,(सहाय्यक संचालक संवर्ग,गट-अ(राजपत्रित) अहमदनगर शहर महानगरपालिका यांचेविरूध्द पोलीस निरिक्षक,तोफखाना पोलीस स्टेशन अहमदनगर यांनी गु.र.नं.५८/२०१८ भादवि कलम १२० (ब) २०१,४०६,४०९,४२०,४६७,४६८,४७१.३४ अन्वये गुन्हा दाखल करून दिनांक ०८.०३.२०१८ रोजी १४.०६ वाजता अटक करण्यात आली आहे.त्यानंतर त्यांना दिनांक१२.०३.२०१८ रोजी जामीन मंजुर होऊन दिनांक १३.०३.२०१८ रोजी त्यांची न्यायालयीन कोठडीतून मुक्तता करण्यात आली आहे.त्याअनुषंगाने त्यांच्याविरूध्द शिस्तभंगविषयक कार्यवाही करण्याचे योजिले आहे.

त्याअर्थी, महाराष्ट्र नागरी सेवा ( शिस्त व अपील ) नियम १९७९ च्या नियम ४ च्या पोटनियम (२) (अ) अन्वये प्रदान केलेल्या शक्तीचा वापर करून,याद्वारे,उक्त श्री.दि.र.झिरपे यांना दिनांक ०८.०३.२०१८ पासून निलंबित करण्यात येत आहे.

आणखी असाही आदेश देण्यात येत आहे की,हा आदेश अंमलात असेल तेवढ्या कालावधीत श्री.दि.र.झिरपे यांचे मुख्यालय सहसंचालक,लेखा व कोषागारे,नाशिक हे राहील.मात्र शासनाच्या पुर्व परवानगीशिवाय त्यांना मुख्यालय सोडता येणार नाही.आणखी असे निदेश देण्यात येत आहेत की,या आदेशांच्या परिणामी अंमलात असलेल्या निलंबनाच्या काळात उक्त श्री. दि. र.झिरपे यांना महाराष्ट्र नागरी सेवा (परग्रहण अवधी,स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन,बडतर्फी व सेवेत काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने )नियम १९८१ च्या नियम ६८ नुसार निर्वाह भत्ता व पुरक भत्ते अनुज्ञेय असतील,अनुज्ञेय निर्वाह भत्ता इ.प्रदान करण्यास सहसंचालक,लेखा व कोषागारे,नाशिक यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

C:\Users\patil.manoj\Desktop\2017\New folder\Letter1.docx

असे निदेश देण्यात येत आहेत की, महाराष्ट्र नागरी सेवा ( शिस्त व अपील ) नियम १९७९ मधील नियम १६ च्या तरतुदी लक्षात घेता,निलंबित असताना श्री.दि.र.झिरपे यांनी खाजगी नोकरी स्विकारणे किंवा धंदा करणे अनुज्ञेय असणार नाही.निलंबित असताना त्यांनी खाजगी नोकरी स्विकारल्यास किंवा धंदा केल्यास ते गैरवर्तणूकीबद्दल दोषी ठरतील आणि तद्नुसार कार्यवाहीस पात्र ठरतील.तसेच अशा बाबतीत ते निर्वाह भत्यावरील आपला हक्क गमावून बसतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

( मा.रा.गांधी )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,
श्री.दिलीप रघुनाथ झिरपे,मुख्यलेखाधिकारी,(सहाय्यक संचालक संवर्ग,गट-अ(राजपत्रित) अहमदनगर शहर, महानगरपालिका अहमदनगर **(संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय,मुंबई यांचेमार्फत)**

**प्रत:-**

१ संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय,मुंबई(२ प्रती )त्यांना विनंती करण्यात येते की,श्री.दि.र.झिरपे यांचेवर आदेशाची प्रत बजावून ती त्यांना प्राप्त झाल्याच्या संदर्भातील पोच पावती शासनास पाठविण्यात यावी.
२.आयुक्त,अहमदनगर शहर महानगरपालिका,अहमदनगर.
३. सहसंचालक,लेखा व कोषागारे,नाशिक
४.पोलीस निरीक्षक,तोफखाना पोलीस स्टेशन,अहमदनगर
५.कक्ष अधिकारी (कोषा-२)वित्त विभाग,मंत्रालय,मुंबई-३२.
६.संबंधित अधिका-यांची वैयक्तीक नस्ती(द्वारा संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय,मुंबई)
७.निवड नस्ती कोषा-१)वित्त विभाग,मंत्रालय,मुंबई-३२